# राकेश झुनझुनवाला : भारताचे वॉरेन बफेट

– प्रा. विक्रम कौतिक उदार

राकेश झुनझुनवाला यांना भारताचा वॉरेन बफे म्हणून ओळखले जाते. त्यांचा कालावधी ५ जुलै १९६० ते १४ ऑगस्ट २०२२ आहे. राकेश झुनझुनवाला यांचा जन्म ५ जुलै १९६० रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे वडील आयकर विभागात अधिकारी होते आणि ते शेअर बाजारात गुंतवणूक करायचे तेथूनच राकेश झुनझुनवाला यांना शेअर बाजारात पैसे गुंतवण्याची इच्छा होत गेली. वाणिज्य शाखेत पदवी घेतल्यानंतर त्यांनी १९८५ मध्ये इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडिया मधून सीएचा कोर्स केला. यानंतर त्यांनी शेअर बाजारात जाण्याची इच्छा व्यक्त केली पण वडिलांनी पैसे देण्यास नकार दिला. आधी स्वतः पैसे कमव आणि मग शेअर बाजारात प्रवेश कर असं त्यांच्या वडिलांनी सांगितले होते.

१९८० च्या दशकाच्या सुरुवातीस शेअर बाजारामध्ये पाच हजारांच्या गुंतवणुकीस त्यांनी सुरुवात केली होती. फोर्ब्स मासिकानुसार, झुनझुनवाला यांची शेअर बाजारातील गुंतवणूक ५.८ अब्ज डॉलर्स (सुमारे ४६ हजार कोटी रुपये) आहे. टाटा, टायटन सह अनेक बड्या कंपन्यांचे शेअर्स झुनझुनवाला यांच्या पोर्टफोलिओमध्ये समाविष्ट आहेत.

छोट्या गुंतवणुकीतून मोठा निधी निर्माण होतो. परंतु, योग्य रणनीती आणि शेअर बाजारात पैसे गुंतवल्यासच परतावा मिळतो. देशातील दिग्गज गुंतवणूकदार आणि बाजारातील 'बिग बुल' राकेश झुनझुनवाला यांनी गेल्या दोन दशकांत पैशातून पैसा कमावला आहे. त्यांना भारताचे वॉरेन बफे मानले जाते.

वारेन बफे यांचा जन्म ३० ऑगस्ट १९३० रोजी झाला होता ते एक अमेरिकन उद्योजक, गुंतवणूकदार आहेत. बर्कशायर हॅथवे चे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ते काम करतात. २००८ पर्यंत ६६ अब्ज अमेरिकन डॉलरचे अंदाजे निव्वळ संपत्ती असल्याने त्यांना जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून स्थान दिले.

झुनझुनवाला यांना शेअर मार्केटमध्ये रस होता. कारण त्यांनी त्यांच्या वडिलांना त्यांच्या मित्रांसोबत याबद्दल बोलताना पाहिले होते. त्यांच्या वडिलांनी त्यांना

शेअर बाजाराच्या क्षेत्रात मार्गदर्शन केले असले तरी, त्यांनी कधीही त्यांना तेथे पैसे गुंतवण्याची ऑफर दिली नाही. राकेश झुनझुनवाला एवढ्यावरच थांबले नाही आणि कॉलेजला जायला लागताच शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करू लागले.

राकेश झुनझुनवाला यांनी १९८५ मध्ये पहिल्यांदा शेअर बाजारात पाऊल ठेवले त्यांनी ५०००/- रुपये गुंतवले आणि १९८६ मध्ये पहिला नफा कमवला. त्यांनी टाटा टी कंपनीचे शेअर ४३ रूपयांना विकत घेतले आणि तीन महिन्यांनी १४३ रुपये प्रति शेअर या दराने विकले त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहीले नाही.

२००३ मध्ये राकेश झुनझुनवाला यांनी टाटा समूहाची आणखी एक कंपनी टायटन कंपनीत गुंतवणूक केली. या एका शेअर्स ने त्यांचे नशिबच पलटवले. त्यांनी ६ कोटी शेअर्स प्रत्येकी ३ रुपये दराने खरेदी केले होते. आज त्या एका शेअरची किंमत १९६१ रुपये आहे. त्यांच्या पोर्टफोलिओ मध्ये अनेक कंपन्यांचे शेअर्स आहेत, यामध्ये सेल, टाटा मोटर्स, टाटा कम्युनिकेशन, लुपिन, इंडियन हॉटेल्स, इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स, फेडरल बँक, एस्कॉर्ट लिमिटेड, टायटन कंपनी इत्यादी कंपन्यांचा समावेश आहे.

**राकेश झुनझुनवाला यांचे गुंतवणूकचे मापदंड**

- ☐ ज्यावेळी इतर लोक शेअर्स विकत असतील तेव्हा त्याची खरेदी करा व ज्यावेळी इतर लोक शेअर्स विकत घेत असतील त्यावेळी विक्री करा.
- ☐ विचार न करता गडबडीत घेतलेले निर्णयामध्ये नुकसान होते त्यामुळे कोणत्याही स्टॉक मध्ये पैसे लावण्याच्या अगोदर स्वतःला वेळ द्यावा. अशा कंपनीमध्ये गुंतवणूक करा की ज्यामध्ये मजबूत प्रबंधन व प्रतिस्पर्धी असेल.
- ☐ भावनात्मक रित्या केलेली गुंतवणूक नेहमी नुकसान देते.
- ☐ शेअर बाजारात गुंतवणूक करणे नेहमीच बँकांइतके सुरक्षित नसते. जर येथे मोठा परतावा असेल तर धोका देखील आहे. म्हणूनच कंपनीची संपूर्ण माहिती घेतल्यानंतरच पैसे गुंतवणे महत्त्वाचे आहे. एखाद्याने शेअरमध्ये पैसे गुंतवू नये कारण इतर लोक त्यात पैसे गुंतवत आहेत.
- ☐ तुमच्याकडे गुंतवणूक करण्यासाठी चांगली रक्कम असू शकते. परंतु तुम्ही सर्व पैसे एकाच वेळी गुंतवले पाहिजेत असे नाही. नफा मिळवण्याची इच्छा चांगली आहे, परंतु नियमानुसार केवळ एक छोटी गुंतवणूक चांगल्या परताव्याची हमी देते.
- ☐ कोणत्याही एका शेअर्समध्ये पैसे गुंतवताना तुमच्या गुंतवणुकीची रक्कम भागांमध्ये विभागून घ्या आणि वेळोवेळी खरेदी करा. जर शेअर्स ची किमत कमी झाली तर खरेदी सुरू ठेवा. यामुळे तुमच्या खरेदीची सरासरी

कमी होईल.

- □ शेअर बाजारात कंपन्यांवर किती कर्ज आहे यावर लक्ष ठेवून राहिले पाहिजेत. कर्ज कमी असेल तर कंपन्यांवर रोखीचा दबाव राहणार नाही. पण, कर्ज जास्त असल्यास कंपनीचे मूल्यांकन कधीही चढउतार होऊ शकते. गुंतवणूक करण्यापूर्वी कंपनीच्या कर्जाचा आढावा घ्या.
- □ उधारीच्या पैशांनी कधीच गुंतवणूक करू नका. शेअर्स बाजाराबाबत तुमचा अंदाज चुकीचा ठरू शकतो. तुम्ही एखाद्या वेळी एका कंपनीचे शेअर्स खरेदी केले आणि तुमच्या अंदाजानुसार त्या शेअर्स दर वधारला अथवा घसरला नाही तर तुम्हाला नुकसान होऊ शकते. अशावेळी उधारीने घेतलेल्या पैशांमुळे तुमची चिंता आणखी वाढू शकते.
- □ तुम्ही ज्या चुका सहन करू शकता, अशाच चुका करा. त्यामुळे पुढील चुका टाळू शकता. तुम्ही जी चूक करता तीच चूक पुन्हा करणे टाळले पाहिजे.
- □ जोखीम ( ठखडघ) या चार शब्दांपासून सावध राहा. शॉर्ट टर्ममध्ये तुम्ही जेवढे नुकसान सहन करू शकता. तेवढीच गुंतवणूक करा. त्यामुळे गुंतवणूक करण्याआधी तुम्ही जोखीम तपासून पाहायला हवे. अनेकदा गुंतवणूकदार अधिक जोखीम स्वीकारतात आणि स्वत: च्या अडचणी वाढवतात.
- □ शेअर बाजारात यशस्वी होण्यासाठी तुम्हाला आशावादी राहावे लागेल. गुंतवणूकदार म्हणून आशावादी असले पाहिजे. शेअर बाजारात तुमच्या संयमाची, धैर्याची परीक्षा होते. शेअर बाजारात उतावीळ असणे चांगले नसते.

झुनझुनवाला यांच्या यशाचं पहिलं गुपित म्हणजे खरेदी करताना आपण सारासार विचार करण्याला पर्याय नाही. तुम्ही शेअर विकत घेताना व विकताना दोन्ही वेळेस अभ्यासपूर्वक निर्णय घ्यायला हवे. काही वेळेला कंपनीच्या कामाविषयी असमाधानकारक माहिती समोर येते अशावेळी घाबरून न जाता एक गुंतवणूकदार म्हणून आपण विश्वास ठेवायला हवा.

राकेश झुनझुनवाला यांचा दृष्टीकोन नेहमीच दीर्घकालीन गुंतवणूकीचा राहिला आहे. ते अनेकदा सुरुवातीच्या गुंतवणूकदारांना दीर्घकाळ गुंतवणूक करण्याचा सल्ला द्यायचे. अल्पावधीत नफा मिळवण्याऐवजी गुंतवणुकीला अनेक पटींनी वाढ करण्यासाठी वेळ दिला पाहिजे असे त्यांचे मत आहे. झुनझुनवाला यांच्या म्हणण्यानुसार बाजारात पैसे परिपक्व होण्यासाठी वेळ द्या, तुम्हाला थोडी वाट पहावी लागेल पण परतावा नक्की मिळेल.



MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE-17

वरील त्यांच्या या तत्त्वज्ञानानुसार व त्यांनी केलेल्या कामगिरीने ते भारतातील यशस्वी गुंतवणूकदार व वारेन बफेट आहेत हे सिद्ध होते .

### संदर्भ सूची –


१. https://mr.wikipedia.org/wiki/

२. https://navbharattimes.indiatimes.com/business/business-news

३. https://biharhelp.in/rakesh-jhunjhunwala-biography-in-hindi/

४. https://zeenews.india.com/hindi/business